दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/४२

# वृत्तपत्र निवेदन

## महानिर्मितीतर्फे कारागीर (क) भरती प्रक्रियेची पहिली निवड सूची जाहीर
## उर्वरित प्रकल्पग्रस्तांची दुसरी निवड सूची लवकरच जाहीर होणार

महानिर्मितीतर्फे जाहिरात क्र. ०५/२००९ अन्वये कारागीर - क पदांसाठी भरती प्रक्रिया सुरु असून काल दि. २७ जानेवारी २०१० रोजी रात्री उशिरा महानिर्मितीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर **निवडलेल्या १७७ उमेदवारांची फक्त पहिली सूची** सध्या जाहीर करण्यात आली आहे. सदर सूची जाहीर करताना ही निवडप्रक्रियेची फक्त पहिली सूची असून त्यात सध्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांचाच समावेश आहे, ही बाब स्पष्ट करण्यात आली होती.

तथापि, महानिर्मितीच्या परळी प्रकल्पस्थळी आणि चंद्रपूर औ.वि. केंद्र येथे काही असामाजिक प्रवृत्तींनी हिंसक प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर महानिर्मितीतर्फे तातडीने स्पष्ट करण्यात येत आहे की, महानिर्मितीने कारागीर - क पदावर सुमारे १०७६ उमेदवारांची भरती करण्यासाठी सुरु केलेल्या निवडप्रक्रियेत महानिर्मितीच्या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य दिले जाईल, हे वेळोवेळी जाहीर केलेले आहे. ही भरती प्रक्रिया राबविताना शासकीय संविधानिक व वैधानिक धोरणास अनुसरून कारागीर - क पदासाठी आय.टी.आय. धारक उमेदवारांची ट्रेड टेस्टही घेण्यात आली होती. त्यानुसार पहिली निवड यादी सध्या जाहीर करण्यात आली आहे. आगामी महिन्याभरात जाहीर होणाऱ्या दुसऱ्या सूचीत देखील ट्रेड टेस्ट उत्तीर्ण झालेल्या अन्य पात्र प्रकल्पग्रस्तांचा समावेश असेल, हे महानिर्मितीतर्फे पुन्हा स्पष्ट करण्यात येत आहे. तसेच जे प्रकल्पग्रस्त उमेदवार सध्या ट्रेड टेस्ट उत्तीर्ण झाले नसतील, अशा प्रकल्पग्रस्त उमेदवारांनादेखील महानिर्मितीमध्ये अप्रेंटिस किंवा तत्सम प्रशिक्षणार्थी म्हणून विद्या वेतनावर निवडण्यात येऊन व एक वर्षाच्या प्रशिक्षणानंतर त्यांची पुन्हा ट्रेड टेस्ट घेण्याचेही विचाराधीन आहे.

महानिर्मितीने सर्व प्रकल्पग्रस्तांप्रती आपले सहानुभूतिपूर्वक धोरण वेळोवेळी चर्चेद्वारे जाहीर केले असताना व त्याप्रमाणे भरतीप्रक्रिया चालू असताना देखील महानिर्मितीच्या प्रकल्पस्थळी हिंसक आंदोलन होत आहेत, ही खेदाची गोष्ट आहे. गैरसमजुतीतून उद्भवलेल्या अशा अकारण हिंसक आंदोलनामुळे वीज प्रकल्प उभारणी कार्यात अडथळे निर्माण होत असून सरकारी मालमत्तेचे नुकसानदेखील होत आहे. या पार्श्वभूमीवर अशा हिंसक कारवाईमध्ये सहभाग आढळलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांना यापुढे सेवाभरतीसाठी पात्र धरले जाणार नाही, हे देखील महानिर्मितीतर्फे स्पष्ट करण्यात येत आहे.

---

दिनांक : २८/०१/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**